**तमसो मा ज्योतिर्गमय**

डिसेंबरचा महिना. तिन्ही सांजची वेळ. बाहेर अंधारून आलेले. घरात येताच हतपाय धुऊन, ज्ञानेश्वरांच्या मूर्तीपुढे मी निरांजन लावले, उदबत्ती लावली आणि सायंप्रार्थना म्हणू लागले, "शांताकारम् भुजगशयनम् ... " म्हणता म्हणता ओठावर चरण आले, "असतो मा सत् गमय ... तमसो मा ज्योतिर्गमय" आणि त्या चरणाबरोबरच माझे मन एक वेगळ्याच विचारलहरीवर तरंगू लागले. माझ्या मनात आले, आपल्याला अज्ञात असलेल्या एका सर्वव्यापी शक्तीला आपण मनोभावे प्रार्थना करीत आहोत, तिच्यापुढे नम्र होऊन आपण म्हणतो आहोत, "अंधारातून प्रकाशाकडे, तिमिरातून तेजाकडे मला ने." पण आपल्या जीवनात आणि त्याभोवती असलेल्या जगात केवळ अंधारच आहे काय? छे-असं कसं होईल? तुरळक का असेनात पण प्रकाश-शलाकाही आहेतच की! त्यानेच तर आपल्या मनाचा-जीवनाचा गाभारा वेळोवेळी उजळून निघतो ना?

हा विचार मनात येताच तीव्रतेने मला कुसुमची आठवण झाली. कुसुम ही माझी चुलत मैत्रीण! म्हणजे माझ्या मैत्रिणीची मैत्रीण. दादासाहेबांनी मोठ्या थाटात तिचे लग्न केले होते. त्यांचा जावई बडा सरकारी अधिकारी होता. युद्ध खात्याशी संबंधित असलेल्या कोणत्याशा विभागात त्याला मोठी नोकरी होती. कमावलेल्या बांधेसूद शरीराला त्याच्या सुंदर गुलाबी गोरेपणाने एक आगळीच शोभा आली होती. इंग्रजी विषय घेऊन एम. ए. झालेला हा मोठा नीटस आणि नम्र तरूण नवरदेव, कुसुमला फार अनुरूप होता. तीही गोरीपान होती अगदी चंद्रप्रकाशासारखी! आणि एम. ए. पर्यंतच्या सर्व परीक्षेत तिनेही उत्तम नाव मिळवले होते. तिचा स्वभाव होता खूप बोलका आणि स्पष्टवक्ता! कोणत्याही गोष्टीत खोटेपणा, दांभिकपणा, अन्याय असे काही दिसले की, या स्वारीने त्यावर आपली तोफ डागलीच म्हणून समजावे, पण ती वात्रट आणि गमत्या स्वभावाचीही 'तशीच' होती. तिच्यासाठी तिच्या वडिलांनी वरसंशोधन सुरू केल्याचे जेव्हा मला कळले, तेव्हा विनोदाने मी तिला म्हणायची, "कुशे, सफरचंदसारखा छान नवरा पसंत कर हं. नाहीतर भेटायचा एखादा काळाराम तुला! वरमाला घेऊन ती उभी राहिली तेव्हा आम्हा मैत्रिणींचा घोळका तिच्या पाठीशीच होता ना! तर वळूनवळून मला विचारते कशी, "काय गं मालती, आहे ना तुझा मेहुणा सफरचंदासारखा!" तर अशी ही आमची कुसुम!

तिच्या घरातल्या पायऱ्या चढताना तिच्या लग्नसमारंभातल्या, सहवासातल्या अशा कितीतरी गमतीजमती मला आठवत होत्या आणि माझे पाऊल जिन्यातच पुनःपुन्हा थबकत होते. दोन अडीच वर्षांपूर्वीची अन् आजची कुसुम एकच होती पण तिच्या परिस्थितीत केवढे अंतर पडले होते, केवढे स्थित्यंतर झाले होते!

मी आणि वसुमती ती बसली होती त्या खोलीत गेलो. अवघडलेल्या मनाने खाली मान घालून तिच्या शेजारी बसलो. आम्ही आल्याचे कळल्यावर मान वर करून तिने आमच्याकडे पाहिले. क्षणभरच पाहिले आणि पुन्हा शून्य मनाने ती दुसरीकडेच बघू लगली. तिचे घारे डोळे लालबुंद झाले होते, खूप सुजले होते आणि डोळ्याखाली काळी वलये उमटली होती. तिच्या सर्वांगावरच एक विचित्र मलूलपण, उदासपण जाणवत होते. चारदोन पोक्त बाया आणि काही पोरसवदा मुली तिला सोबत करीत होत्या. साऱ्यांच्याच चेहऱ्यावर मन सुन्न करून टाकणारी खिन्नता आढळत होती.

हे सगळे स्वाभाविकच होते कारण आठवड्यापूर्वीच कुसुमचा पती एकाएकी कालवश झाला होता. त्यावेळी कुसुमला चार महिने गेले होते. दिल्लीस आपणही पतीबरोबर जाण्याचा बेत ती करीत होती, पण गर्भसंभवाने तिची प्रकृती थोडी नाजुक आली होती. म्हणून विश्रांतीसाठी पुण्यातच तिला काही दिवस ठेवण्याचे तिच्या पतीने ठरविले होते. पुण्याच्या स्टेशनवर गेल्यावर ती म्हणाली, "का कोण जाणे पण यावेळी मला वाटतंय की निदान मुंबईपर्यंत तरी आपण तुमच्याबरोबर यायचं. येऊ का मी अजुनी?" तिच्या अर्जवी बोलण्यावर बापटसाहेब किंचित हसले होते आणि म्हणाले होते, "तुला थोडं बरं वाटू दे मग मुंबईपर्यंतच कशाला, थेट दिल्लीलाच नेणार अहे मी." त्या प्रेमळ उत्तराने कुसुमची कळी खुलली हिती. समुद्राच्या पाण्यावर सूर्यकिरण चमकावे तसे तिचे घारे डोळे आनंदाने चमकले होते. पतीच्या प्रेमाने आणि पोटातील बालजीवाच्या सुखद स्पर्शाने ती पुलकित झाली होती.

या प्रसंगाला तीनचार दिवस लोटले. दुपारी साडेतीन चारची वेळ. आज बापटसाहेबांचे पोहोचल्याचे पत्र यायला हवे होते. म्हणून पोस्टमनची वाट पहात ती घरातच थांबली होती. तिच्या सासूबाई गेल्या होत्या जवळच कुठेतरी प्रवचनाला, घरात ही एकटीच. तेवढ्यात घरासमोरच्या रस्त्यावरून एक खाकी पोशाखधारी ऑर्डरली जाताना तिने पाहिला. फाटकातूनच त्याने विचारले, "नलिनी बापट कोण?" कुसुम म्हणाली, "मीच की?" त्याने प्रश्न केला, " तुमच्याशिवाय घरात दुसरे कोणी नाही का?" ती म्हणाली, " उं-हुं." तशी पुढे न येताच तो मागे वळला आणि म्हणला, "मी जरा वेळाने पुन्हा येऊन जाईन." ती म्हणाली, " बरं. पण काही विशेष काम असलं तर मला सांगा ना!" त्यावर तो काही बोलला नाही. अर्ध्या तासाने त्याने पुन्हा एकदा फाटकापर्यंत चक्कर टाकली. तिसऱ्या वेळी मात्र त्याचा नाईलाजच झाला. कोटाच्या खिशातून एक लिफाफा काढून त्याने तो कुसुमच्या हाती दिला आणि तिची नजर टाळीत अडखळत तो म्हणला, "साहेबांनी दिलाय हा." कुसुमने लिफाफा उघडला, वाचला, त्यात लिहिले होते. "श्रीयुत बापट यांना देवाज्ञा झाल्याचे वृत्त दिल्लीहून आले आहे" लिफाफ्यातील हा मजकूर विस्फारलेल्या डोळ्यांनी कुसुम पुन्हा पुन्हा वाचीत होती. मान हलवीत पण स्वतःशीच मोठ्याने म्हणत होती, "छे, छे, असं होणं शक्यच नाही. यांच्याच नावाचे हे दुसरे कोणीतरी 'बापट' असतील. समोर उभा असलेला शिपाई बिचारा भरल्या डोळ्यांनी यावर काय बोलणार? आसूभरल्या डोळ्यांनी आणि जड पावलांनी तो परत जाऊ लागला. --

मग पळाचाही विलंब न लावता कुसुम सायकलवर बसून सदाशिव पेठेतल्या आपल्या माहेरी गेली. आई-वडिलांच्या हाती तिनेच तो लिफाफा दिला आणि तेवढ्याच धैर्याने व आत्मविश्वासाने ती त्यांना म्हणाली, "हे 'बापट' निश्चितच दुसरे कोणीतरी असणार. यांच्याबद्दल अशी बातमी येणं शक्यच नाही. जाण्यापूर्वी त्यांच्या मणक्यात थोडं दुखत होतं; पण त्यावर मिलिटरी हॉस्पिटलमध्ये ते ट्रीटमेंट घेतच होते आणि त्यांना बरंही वाटत होतं. हा काहीतरी नावाचा घोटाळा झला असावा!"

पण दुर्दैवाने कुसुमचा अंदाज आणि अपेक्षाही नियतीने फोल ठरविली होती.

या अनपेक्षित नि अत्यंत दुःखद घटनेनंतर मी कुसुमला प्रथमच भेटत होते. आपल्या पतीचे अखेरचे दर्शनही आपण घेऊ शकलो नाही या विचारामुळे तिच्या दुःखाची दाहकता कितीतरी वाढली होती. तिची काय व कशी समजूत घालावी तेच मला कळेना. म्हणून मी तिच्या पाठीवरून हात फिरवीत नुसतीच जवळ बसले होते. शेवटी कसेबसे मन आवरून मी तिला म्हटले," कुसुम, तुझ्याशी काय बोलू गं? कसे समजावू तुला? अगदी अंतःकरणापासून एकच सांगते की, आम्ही सगळ्या मैत्रिणी तुझ्या आहोत, तू आमची आहेस. तुझ्या पाठीशी आम्ही सदैव उभ्या आहोत. तू धीराने राहा. -" माझे बोलणे पुरे होते न होते तोच ती म्हणाली, "होय मालती, मला धीरानेच राहायला हवं आता! कारण मी एका पराक्रमी पुरुषाची अर्धांगी आहे. राष्ट्राच्या सेवेत व्यग्र असताना माझ्या पतीने देह ठेवला आहे. माझ्या अश्रूंनी त्यांच्या आत्म्याला मुळीच दुःख देणार नाही. खरंच नाही "- मी तिच्याकडे टक लावून पाहत होते.

तिच्या चेहऱ्यावर तिच्या निश्चयाचे प्रतिबिंब उमटले होते. तिचे डोळे वारंवार डबडबून येत होते; पण त्यातला एक थेंबही ती गालावर ओघळू देत नव्हती. निग्रहाने ती अश्रूंना परतवीत होती. आपले ओठ तिने दाताखाली घट्ट दाबून धरले होते आणि शून्य नजरेने ती दूरवर कुठेतरी बघत होती. जवळजवळ दीड तपानंतरही त्या तेजस्वी कुसुमचे ते चित्र माझ्या मनावरून पुसले गेलेले नाही.

-------------

वर्षा-दीडवर्षामागचा हा एक प्रसंग. कॉलेजमधले काम आटोपून मी घरी निघाले होते. तेवढ्यात समोरून थोडीशी चाकाच्या खुर्चीसारखी दिसणारी एक गाडी चालवीत कोणीसा मुलगा चालला होता. गाडीच्या पाठीवर हात देऊन चालणारा मुलांचा एक घोळकाही त्याच्याबरोबर होता. सायकलच्या उजव्या बाजूस एक चाक होते. अणि त्याला हँडल बसवले होते. ते तो मुलगा फिरवीत होता. मी कुतूहलाने त्या मुलांना म्हटले, "तुम्ही विलिंग्डन कॉलेजातीलच मुले आहात ना आमच्या?" साऱ्यांनी होकारार्थी माना

हलवल्या. बैठ्या गाडीतल्या मुलाकडे माझे लक्ष परत वेधले. दिसायला तो चांगला धष्टपुष्ट होता. त्याचे कपाळ भव्य-रुंद होते. चेहराही कसा घवघवीत होता. हिवाळ्यातल्या कोवळ्या मंद उन्हासारखे हास्य त्याच्या चेहऱ्यवर चमकत होते. मी त्याला विचरले, "काय झालंय रे तुला?" त्याने अगदी सहजपणे आपल्या पायाकडे हात दाखविला. त्याचे दोन्ही पाय मांडीपासून खाली पूर्ण तुटलेले होते. आणि त्या जागी कृत्रिम लोखंडी पाय बसविले होते!

मी त्याच्या पायांकडे मिनिटभर बघतच राहिले. त्याच्याशी पुढे काही बोलायला मला सुचेच ना. रस्ता ओलांडून मी घराकडे वळले. थोडे अंतर चालून गेल्यावर मी मागे वळून पाहिले तेव्हा आपल्या मित्रंबरोबर गप्पागोष्टी करीत, सावकाश गाडी चालवीत तो संथपणे पुढे चालला होता.

दुसऱ्या दिवशी आमच्या 'प्रोफेसर्स कॉमनरूम' मधील मित्रमंडळींकडून त्याची हकिकत कळली ती मोठी हृदयद्रावक होती! काही दिवसांपूर्वी आपल्या एका मित्राबरोबर त्याच्या बहिणीला स्टेशनवर पोहोचवायला हा आमचा 'वसंत' गेला होता. ती बहीण होती लेकुरवाळी. तिला चांगली जागा मिळावी या सद्हेतूने तो अगगाडीत जागा धरायला धावला. गाडी स्टेशनात शिरतच होती. एका डब्याच्या स्टीलच्या दांड्याला त्याने धरले, पण त्याचे नशीब असे खडतर की त्या चकचकीत दांड्यावरून त्याचा हात निसतला आणि चालती गाडी व प्लॅटफॉर्म यांच्या दरम्यान तो पडला. गाडीखाली त्याचे दोन्ही पाय सापडले नि त्याचे तुकडे तुकडे झाले- हे कोवळे पोर जन्माचे पांगळे झाले. डोळ्याचे पाते लवते न लवते तेवढ्यात हा अपघात घडला. त्याच्या आईवडिलांच्या दुःखाला पार उरला नाही. त्यांना हे एकच अपत्य! फार लाडका आणि उत्तम खेळाडू असलेला हा मुलगा असा जायबंदी झाला जन्माचा! ही हकिकत कळल्यापासून जेव्हा जेव्हा त्याची भेट होते तेव्हा तेव्हा मी त्याला आवर्जून विचारते, "काय वसंत, बरा आहेस ना?" तोही मी लांबून दिसले तरी नमस्कार करतो. तो, त्याची चाकाची गाडी आणि त्याच्या अवतीभवती सदैव असणारे त्याचे मित्रमंडळ एखाद दिवशी दिसले नाही तर मला आहे. "कसा रे जातोस कामाला" असे मी विचारताच नेहमीच्याच आनंदी वृत्तीने म्हणाला, " हा रथ अहे की माझा"- त्याच्या या गोडव्या वृत्तीने त्याच्या माझ्यात शिष्य-गुरुऐवजी जिव्हाळ्याच्या स्नेहाचे नाते निर्माण झाले आहे. अपघाताने त्याचे उमलते यौवनच नव्हे तर सारे जीवनच कुस्करले गेले आहे - अकाली पाकळ्या गळलेल्या एखद्या फुलासारखे." पण आपल्या स्वभावाने त्याने नियतीवर मात केलेली पहिली की मला कौतुक वाटते नि मी मनोमन म्हणते, " शाब्बास रे मुला. जैत रे जैत"

थोर साहित्यिक तीर्थस्वरूप भाऊसाहेब खांडेकरांइतका सोशिक माणूस क्वचितच आपल्या पाहण्यात येतो. बालपणापासून अशक्त, दुर्बल प्रकृती आणि अधू दृष्टी यांनी त्यांना घेरलेले. आयुष्याच्या संध्याकाळपर्यंत त्यात नवनवीन आधीव्याधींची भर पडत राहिली. पण भाऊंनी अतिशय संयमाने, धीराने आणि शांतपणे सारे सोसले. भाऊ आमच्या कुटुंबाचे जरा दूरचे आप्त! पण त्यांनी मला वागविले अपल्या मुलीच्या मायेने, वात्सल्याने. कामाची कितीही धावपळ असली तरी भाऊंना भेटल्याशिवाय कोल्हापूरहून परत आलेली मला आठवत नाही. विद्यापिठाची एक सभा आटोपून एकदा दुपारची उन्हाचीच मी भाऊंकडे गेले होते. दरवाजाला कुलूप पाहून मी जरा गोंधळले पण तरीही दारावरची घंटी मी दाबली. आतून आवाज आला, "कोण आहे?" "मी मालूताई". त्यावर हळूहळू चालत ते दरवाजापाशी आले, आतल्या भिंतीवरची किल्ली दरवाजाच्या जाळीतून त्यांनी माझ्या हाती सरकवली आणि परत बिछान्यावर जाऊन झोपले. "विश्वासू आणि कष्टाळू चाकर भेटणे कठीण होऊ लागले आहे. घरच्या मुलामुलींना मीच म्हटले मग तुम्ही कुलूप लावून जात जा दुपारभर. मोलकरीण येते चहाच्या वेळेपर्यंत. तुम्ही काय घेणार चहा-कॉफी? जे हवे ते आत जाऊन करून घ्या हं." भाऊ मायेने सांगत होते. मी त्यांच्याजवळ जाऊन बसले. पायजमा, शर्ट घातलेले, अत्यंत कृश झालेले, भाऊ पाहून पोटात गलबलले. त्यांच्या हातापायावर जणू निवडुंग उगवावा इतकी तेथील त्वचा खडबडीत झालेली होती. त्यावर हळुवारपणे हात फिरवीत मी बसले होते. स्वतःच्या प्रकृतीबद्दल काहीही कुरकुर न करता अधूनमधून डोळ्यांना लावलेला काळा चष्मा खालीवर करीत, हाताची घडी घालून बिछान्यावर पडल्यापडल्या ते माझ्याशी गप्पागोष्टी करीत होते. "तुम्ही फार जपलं पाहिजे प्रकृतीला. काय?" ते म्हणाले.आणि नंतर त्यांनी माझा अभ्यास, वाचन सगळ्याची बारकाईने चौकशी केली. मी अवश्य वाचावी अशी कितीतरी मराठी-

इंग्रजी पुस्तके मला सुचविली. साहित्य-जीवन इत्यादी त्यांच्या आवडीच्या विषयांवर ते बोलू लागले. ते सारे कळकळीचे व अभ्यासपूर्ण बोलणे ऐकताना "अनंतहस्ते कमलावराने, देता घेशील किती दो करांनी?" अशी माझी स्थिती होऊन गेली.

त्यांची अखेरची भेट झली ती त्यांच्या निधनापूर्वी थोडे दिवस-! भाऊंचा एक डोळा जवळजवळ निकामीच झाला होता. दुसऱ्या डोळ्यावर एक शस्त्रक्रिया झाली होती पण ती जखम अपेक्षेप्रमाणे भरून न येता चिघळू लागली. त्यामुळे त्यांच्या मेंदूला व पर्यायाने त्यांच्या जिवाला धोका निर्माण होईल अशी चिंता डॉक्टर मंडळींना वाटू लागली. त्यांन नाईलाजाने व उदास मनाने भाऊंना म्हटले, "भाऊ हा दुसरा डोळा त्याच्या खोबणीतून काढायला लागणारसे वाटते." - अविचल चित्ताने भाऊ त्यावर म्हणाले, "काढून टाका मग. माझी त्याला केव्हाही तयारी आहे." सर्वजण थक्क झाले. त्यांच्या पंचाहत्तरीत अनेक साध्य आधीव्याधींनी शरीर आधीच पोखरले असताना या नव्या संकटाला इतक्या सहजपणे व धीराने सामोरे गेलेले भाऊ मी पाहात होते. यथाकाल ती शस्त्रक्रियाही झाली आणि जवळजवळ पूर्ण अंधत्व भाऊंच्या नशिबी आले. त्यांना भेटायला मी गेले होते. जवळ काही आप्त मंडळी बसली होती."भाऊ कसं वाटतंय?" काय बोलावे ते न सुचून मी उगाचच प्रश्न केला. मिनिट-दोन मिनिटांनी धिम्या स्वरत उत्तर आले, "मालूताई, इतके दिवस मला बाह्यचक्षूंनी पाहता येत होते पण आता ती सर्व शक्ती माझ्या अंतःचक्षूंना मिळली आहे. सारा दिवस डोळे मिटून पडतो आणि बालपणापासूनची अनेक चित्रे या डोनी पाहात राहतो. हाही एक जीवनाचा अनुभवच आहे. मी बरा आहे. तुम्ही कशा आहात पण? पोटदुखीचे निदान काय केले डॉक्टरांनी?" मी भाऊंना काय उत्तर दिले ते माझे मलाच आठवत नाही कारण त्या उत्तरात माझे मनच नव्हते. नियतीबरोबरचा आपला अखंड संघर्षाने भरलेला जीवनपट शांतपणे पाहणारे, त्याबद्दल उद्वेग वा कुरकुर प्रकट न करणारे जराजर्जर व्याधिग्रस्त पण धीरोदात्त भाऊ मी पाहत होते. माझे डोळे भरून आले होते. आणि हात अभावितपणे पुन्हापुन्हा जोडले जात होते. आयुष्यभर आपल्या विचारांनी, वाणीने, लेखणीने ज्यांनी समाजाला सदाचार, सुविचार शिकविला, ध्येयवाद, माणुसकी यांची उज्ज्वल शिकवण दिली, दुःखितांचे, दलितांचे अश्रू अंतरीच्या कळवळ्याने पुसले असे भाऊ आता अनंताच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवू लागले होते. मला पितृस्थानी वाटणाऱ्या भाऊंना पाहताना मला शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यांचे स्मरण झाले! भाऊंचे ते चित्र माझ्या मनावर कायमचे कोरून राहिले आहे.

या प्रसंगाची आठवण झाली की मी मनाशी म्हणते, "दुर्दैवाचा आघात निर्धाराने पचवणारी आमची कुसुम, नियतीला हरवणारा माझा विद्यार्थीमित्र वसंत आणि ऋषिमिनींच्या कुळात शोभावे असे स्थिरचित्त, प्रतिभावंत भाऊ, ही सारी माणसे म्हणजे आपल्या जीवनातला दुःखाचा अंधार दूर करणारे प्रकाशकिरणच नव्हेत काय? ज्या अदृश्य शक्तीकडे मी 'तमसो म ज्योतिर्गमय' म्हणून अगत्याने प्रार्थना करीत होते तिनेच धारण केलेली ही मानवी तेजस्वी रूपे नाहीत काय? या तेजाच्या लाटा मी व माझ्यासारख्या असंख्य सामान्यांपर्यंत येऊन पोहोचतात तिथे प्रकाशाचे पावनतीर्थ निर्माण करतात, याचे ऋण मानणे आपले कर्तव्य नाही काय?" या जाणिवेने डोळे पाणावतात व मन म्हणते, " मृत्योर्मा अमृतं गमय"